ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ | पुणें, बुधवार तारीख १४ फेब्रुवारी, १९५१ | अंक ७

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## महाराष्ट्रांतील साखर कारखाना

म्हणजे

" कृषि, गौरक्ष्य, वाणिज्य "

परंतु

साखर–विक्रीचें "वाणिज्य" सरकारनें स्वतःकडे घेतल्यामुळें
साखर–विक्रीची रोख रकम हातीं येईपर्यंत

★ एक वर्ष मुदतीच्या ठेवी सिंडिकेट स्वीकारतें ★

★ शेअर–विकी सुरू आहे ★

★ ठेवीची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के ★

शेअरचे व ठेवीचे फॉर्म कंपनीच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

दि. ५ फेब्रुवारी १९५१.
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एल्एल्. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

## विविध माहिती

**आमच्या बोटी परत द्या**—गेल्या महायुद्धांत अमेरिकेनें रशियाला ७२० बोटी उसन्या दिलेल्या होत्या. त्यांत व्यापारी व लष्करी बोटींचाही समावेश होता. ह्या बोटींपैकीं ६७० बोटी परत करण्याची मागणी अमेरिकेनें रशिआकडे केली आहे. युद्धकाळांत अमेरिकेनें रशिआला ११०० कोटी डॉलर्सचा मालहि उधार-उसनवार म्हणून दिला होता.

**ब्रिटनमधील मोटारींचें उत्पादन**— ब्रिटनमध्यें पोलादाचा तुटवडा पडल्यामुळें घरच्या बाजारपेठेसाठीं करावयाच्या मोटारींच्या संख्येंत ३०,००० मोटारींची कपात करावी लागणार आहे. मोटारीच्या धंद्याला लागणाऱ्या पोलादाच्या पुरवठ्यांत १५ ते २० टक्के कपात करण्यांत आलेली आहे. चालू वर्षी घरच्या बाजारपेठेसाठीं फक्त ८०,००० मोटारी तयार करण्यांत यावयाच्या आहेत.

**भारतापासून इंग्लंडनें कोळसा विकत घेतला**—भारताकडून ब्रिटननें ३०,००० टन कोळसा विकत घेण्याचा करार केला आहे असें समजतें. हा कोळसा चालू वर्षाच्या मार्च महिन्यांत ब्रिटनला रवाना करण्यांत येईल. ब्रिटनमध्यें सध्यां कोळशाचा तुटवडा पडला असल्यानें ब्रिटिश कोल बोर्ड मिळेल तेथून कोळसा विकत घेत आहे. ब्रिटनमध्यें सध्यां कोळशाचा रोजी जितका खप आहे, त्याचा विचार करतां भारतानें दिलेला कोळसा ब्रिटनला सरासरी १ तासभर पुरेल. भारताकडून कोळसा घेण्याचा ब्रिटनचा हा पहिलाच प्रसंग आहे.

**द. अमेरिकेंत रशिआची विकाऊ विमानें**— द. अमेरिकेच्या बाजारांत सोव्हिएट रशिआच्या विक्रेत्यांनीं वहातुकीचीं विमानें विकण्यास ठेवलीं आहेत. युरोपमध्यें कमी किंमतीच्या मोटारीही सोव्हिएट विक्रेते विकूं लागले आहेत. विमानांची किंमत ४० हजार डॉलर व मोटारींची किंमत ८४० डॉलर्सपर्यंत सांगण्यांत येते.

**ओरिसांतील तांदुळाचें पीक**—ओरिसा राज्यांतील पिकांना पूर व वादळें ह्यांच्यामुळें बराच धक्का पोचला तरी सुद्धां सुमारें ९,८०,००० मण तांदूळ त्या राज्याबाहेर पाठवितां येईल इतपत भाताचें पीक आहे. ताग व भात ह्यांचें पीक एकाच जमिनींत एकाच हंगामांत काढतां येत नाहीं अशी समजूत होती. परंतु कटक जिल्ह्यांतील ३३,००० एकर जमिनींतील तागाचें पीक काढून घेतल्यानंतर भात लावण्यांत यश आलें आहे असें समजतें.

**चीनसाठीं चेकोस्लोव्हाकिआची यंत्रसामुग्री**—कम्युनिस्ट चीनला अवजड यंत्रसामुग्री पुरविण्याचें चेकोस्लोव्हाकिआनें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें यंत्रसाहित्याचा पहिला हप्ता पोलंडमार्गे चीनला रवाना झाला. ह्या यंत्रांत रस्ते करण्याची सामुग्री आणि कालवे खणण्याचें साहित्य ह्यांचा विशेष भरणा आहे.

**चांदीगड येथें एंजिनिअरिंग कॉलेज**—पू. पंजाबची नवी राजधानी, चांदीगड येथें एक एंजिनिअरिंग कॉलेज काढण्यांत येणार आहे. ह्या वर्षी कॉलेजच्या इमारतीचा कोनशिला समारंभ करण्यांत येणार आहे. हें एंजिनिअरिंग कॉलेज भारतांतील एक उत्कृष्ट कॉलेज करण्याचा पंजाब सरकारचा विचार आहे.

**बंगलोरला महात्माजींचा पुतळा**—बंगलोर कॉर्पोरेशननें महात्माजींचा ब्रॉंझ धातुचा पुतळा बसविण्याचें ठरविलें आहे. पुतळ्याचें काम मि. डोरिंग नांवाच्या एका जर्मन शिल्पकाराला देण्यांत आलें आहे. पुतळ्यासाठीं २० हजार रुपये खर्च येणार असून तो बंगलोर मधील सार्वजनिक उद्यानांत बसविण्यांत येणार आहे.





टाटा अॅग्रिको फावडीं खास जास्त कार्बन असलेल्या पोलादापासू बनविण्यांत येतात व त्यांना नीट तपासणी केलेले लाकडी दांडे बसविले असतात. हीं फावडीं वापरण्यास अत्यंत सोईस्कर असल्यानें तीं वेळे व श्रमाची बचत करतात ! शिवाय अत्यंत मजबूत व टिकाऊ असल्यानें तीं वापरणें अखेरीस फायदेशीरच पडतें !

अंतिम काटकसरीसाठीं टाटा अॅग्रिको हत्यारें खरेदी

टाटा अॅग्रिको अवजारें

A I C TRADE MARK

शाखा : मुंबई, मद्रास, कानपूर, जलंधर, नागपूर, विजयनगरम व सिकंदराबाद

नजिकच्या लोखंडी-सामानाच्या दुकानांत चौकशी करा अगर परस्पर आम्हां

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४११ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनकोसोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

संस्थेकडे खालीलसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

★शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धावपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५.

★ग्राहक सहकारी लागणारा माल संघ दुकानामार्फत पुरवि

★शेतकऱ्यांचा शेती संस्थेच्या अडत दु पुणें येथील किफायतशीर रीत दिला जातो.

★जिल्ह्याबाहेरील सहकारी संस्था पुणें बाजारपेठेंत रीतीनें विकून दि

११५।१२६ भवानी गूळ आळी, पुणें

# अर्थ

बुधवार, ता. १४ फेब्रुवारी, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## १९४९ मधील हिंदी बँकिंग

१९४९ मधील हिंदी बँकिंगची तपशीलवार माहिती देणारें "स्टॅटिस्टिकल टेबल्स रिलेटिंग टु बँक्स इन इंडिया" हें रिझर्व्ह बँकेचें वार्षिक प्रकाशन नुकतेंच बाहेर पडलें आहे. बँकांकडील ठेवींत १९४८ च्या मध्यासच घट होऊं लागली होती; ही प्रवृत्ति १९४९ मध्येंहि चालू राहिली. १९४८ मध्यें ठेवींतील घट ४२ कोटी रुपये होती; १९४९ मध्यें आणखी ८८ कोटींच्या ठेवी कमी होऊन एकूण ठेवींची रक्कम ९२२ कोटींवर आली. ह्या घटींतील मोठा भाग करंट ठेवींतील घटीचाच आहे. सहकारी बँकांकडील ठेवींत मात्र जलद वाढ होत चालली आहे. १९४८ मध्यें त्यांचेकडे ७१ कोटी, ७९ लक्ष रुपयांच्या ठेवी होत्या त्या १९४९ मध्यें ८७ कोटी, २६ लक्ष रुपयांवर गेल्या. खालील तक्त्यांवरून १९४७, १९४८, व १९४९ मधील बँकांची परिस्थिति स्पष्ट होईल:—

### ठेवी, रोकड, कर्जें व इनव्हेस्टमेंट

| | ठेवी (लक्ष रु.) | रोख (लक्ष रु.) | कर्जें (लक्ष रु.) | इनव्हेस्टमेंट (लक्ष रु.) | कचेऱ्या |
|---|---|---|---|---|---|
| १९४७ | १०,५२,०८ | १८६,४५ | ४८४,७२ | ४७५,२४ | ४,८१९ |
| १९४८ | १०,१०,२९ | १५६,७२ | ५०६,०३ | ४६४,९७ | ४,६७२ |
| १९४९ | ९,२२,११ | १४७,८१ | ४९१,२८ | ३७०,९३ | ४,४३६ |

शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत १९४९ मध्यें ९७ ची घट होऊन त्यांची संख्या २८६४ झाली. बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या १३९ नें कमी होऊन त्यांची संख्या १५७२ उरली. हिंदी बँका परदेशांतील, विशेषतः पाकिस्तानांतील, कचेऱ्या बंद करीत आणीत आहेत. १९४८ मध्यें शेड्यूल्ड बँकांच्या अशा २२६ कचेऱ्या होत्या त्या १९४९ मध्यें १५२ उरल्या. बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या परदेशांतील कचेऱ्या ४६ च्या ३७ झाल्या. सहकारी बँकांच्या कचेऱ्या मात्र ५८१ च्या ६२९ झाल्या. खालील तक्त्यांत तुलनात्मक आकडे दिले आहेत:—

### बँकांच्या कचेऱ्या

| | १९४७ | १९४८ | १९४९ |
|---|---|---|---|
| १ शेड्यूल्ड बँका | | | |
| इंपीरिअल बँक | ३६२ | ३६७ | ३७७ |
| इतर हिंदी बँका | २,५४५ | २,५२० | २,४१२ |
| विदेशी बँका | ८० | ७४ | ७५ |
| एकूण | २,९८७ | २,९६१ | २,८६४ |
| २ बिगर-शेड्यूल्ड बँका | | | |
| अ २ | ५५६ | ५६७ | ५२२ |
| ब | ७४३ | ६९३ | ६५० |
| क | २४४ | २११ | २०० |
| ड | २७३ | २३६ | १८५ |
| विदेशी बँका | १६ | ४ | ५ |
| एकूण | १,८८२ | १,७११ | १,५७२ |
| ३ सहकारी बँका (भांडवल + रिझर्व्ह १ लक्ष रु. पेक्षा अधिक) | ५४८ | ५८१ | ६२९ |

प्रस्तुत प्रकाशनांत हिंदी बँकिंगविषयक दिलेल्या सर्व तक्त्यांचा परामर्श येथें घेण्याचा उद्देश नाहीं. उदाहरणार्थ, बँकांच्या कर्जांत घट झाली असली तरी सुद्धा ठेवी कमी झाल्याकारणानें कर्जांचें ठेवींशीं प्रमाण ४९% वरून ५२% वर चढलें, ही प्रवृत्ति बहुतेक बँकांच्या अनुभवाची आहे आणि ठेवींशीं कर्जांचें प्रमाण, कर्ज मागणी जबर असतांना व ठेवींत वाढ होत नसतांना, योग्य मर्यादेंत राखणें बँकांना कठीण जात आहे. ठेवींत घट झाली, ती मुख्यतः कर्जरोखे विकून भागविली; कर्जें फार कमी करतां आलींच नाहींत; ह्या गोष्टी स्पष्ट करणारे तक्ते उद्बोधक आहेत.

---

## जागतिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रो. धनंजयरावांचा सल्ला.

मागासलेल्या देशांच्या उद्धारासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सेक्रेटरी जनरलनें पांच अर्थशास्त्रज्ञांची नेमणूक जाहीर केली आहे. न्यूयॉर्क येथें त्यांची बैठक भरणार असून तिचें काम दोन महिने चालेल, अशी अपेक्षा आहे. गोखले इन्स्टिट्यूटचे प्रमुख प्रो. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या बरोबर अमेरिका, इंग्लंड, लेबेनॉन व चिली ह्या देशांतील अर्थशास्त्रज्ञांचाहि ह्या पांचाच्या गटांत समावेश आहे.

---

## लाक्षणिक संप स्थगित

१५ फेब्रुवारी रोजीं सर्व बँकांत एक लाक्षणिक संप घडवून आणण्याचें ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशननें ठरविलें होतें. कोणत्याहि बँकेंत निष्कारण व फाजील नोकरकपात होऊं दिली जाणार नाहीं, ह्या भारत सरकारच्या आश्वासनाचा विचार करण्यासाठीं असोसिएशनच्या मध्यवर्ती कमिटीस जरा वेळ मिळावा म्हणून नियोजित लाक्षणिक संप तूर्त स्थगित केला असल्याचें जाहीर झालें आहे.

---

## बँकांकडील ठेवींत वाढ

२ फेब्रुवारी अखेरच्या शेड्यूल्ड बँकांच्या साप्ताहिक हिशेबाच्या तक्त्यावरून असें दिसतें, कीं त्यांनीं दिलेल्या कर्जांत आणखी २१·८ कोटी रुपयांची वाढ होऊन कर्जांची रक्कम ५०२·५३ कोटी रुपये झाली. हीं जादा कर्जें देण्यासाठीं शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँकेंतील त्यांच्या शिलकांस हात लावावा लागला नाहीं. उलट, त्या शिलकांत ८ लाखांची भर पडून त्यांची रक्कम ४७·९५ कोटी रुपये झाली. शेड्यूल्ड बँकांकडील करंट ठेवी ४·४३ कोटींनीं व मुदती ठेवी ३ कोटींनीं वाढल्या.

---

## महाराष्ट्रीय बँकांच्या एकत्रीकरणाचा प्रश्न

### डेक्कन बँक्स असोसिएशनचा खुलासा

संपादक 'अर्थ' पुणें यांसी—

सा. न. वि. वि. अर्थ साप्ताहिकाच्या दि. ३१ जानेवारी ५१ चे अंकांत 'महाराष्ट्रीय बँकांस मार्गदर्शन' या शीर्षकाखाली पुण्याच्या 'मराठा चेंबर'चे अध्यक्ष श्री. दांडेकर यांनीं चेंबरच्या सहामाही साधारण सभेपुढें महाराष्ट्रीय बँकांच्या एकीकरणासंबंधीं केलेल्या भाषणासंबंधीं आपण आपले विचार प्रदर्शित केले आहेत. त्यांत डेक्कन बँक्स् असोसिएशनच्या प्रतिनिधींशीं महाराष्ट्र बँकांच्या एकीकरणाच्या प्रश्नावर श्री. दांडेकर यांनीं विचारविनिमय केला असला पाहिजे व त्यांच्या चर्चेचें प्रतिबिंब म्हणजेच चेंबरच्या अध्यक्षांची सूचना असा 'स्वाभाविक निष्कर्ष' आपण काढला आहे. पण तो चुकीचा असून डेक्कन बँक्स् असोसिएशनच्या प्रतिनिधींशीं महाराष्ट्रांतील बँकांच्या एकत्रीकरणाबाबत श्री. दांडेकर यांनीं चर्चा केली नव्हती.

कोणाचाही गैरसमज राहूं नये म्हणून हा खुलासा आपल्या साप्ताहिकांत प्रसिद्ध करावा ही विनंति.

पुणें दि. १०-२-१९५१

आपला विश्वासु,
म. त्र्यं. शिंगरे
ऑनररी सेक्रेटरी व ट्रेझरर,
डेक्कन बँक्स् असोसिएशन.
पुणें.

---

### बँक ऑफ इंडिया भांडवल वाढविणार

बँक ऑफ इंडियानें आपलें वसूल भांडवल ५० लक्ष रुपयांनीं वाढविण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी प्रत्येकीं १०० रुपयांचे (५० रु. भरलेले) १ लक्ष भाग विक्रीस काढण्यांत येतील. प्रत्येक शेअर ५० रु. प्रिमिअमनें विकला जाईल, व तो १ जुलै १९५१ नंतरच्या नफ्यास पात्र होईल. १९४२ अखेर बँकेचें वसूल भांडवल १ कोटी रु. होतें. सध्यां तें २ कोटी रु. असून रिझर्व्ह फंड २½ कोटी रुपयांवर आहे. म्हणजे, बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या अटीपेक्षा रिझर्व्ह फंड ५० लक्ष रुपयांनीं मोठा आहे. त्या कायद्याप्रमाणें, बँकांचा रिझर्व्ह फंड त्यांच्या वसूल भांडवलाइतका होईपर्यंत वाढवत न्यावा लागतो. बँकेच्या रिझर्व्ह फंडापैकी १,४९,३६,७५० रुपये, तीन वेळा शेअर्स प्रीमिअमनें विकले त्या प्रीमियमच्या रकमेचेच होतात. आतां पुन्हा प्रीमियमचे ५० लक्ष रुपये मिळतील बँक १४% डिव्हिडंड देत आहे.

---

### प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें
### १९५० अखेरचा संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ७,१९,४२५ | रोख | ६,९०,४३० |
| रिझर्व्ह फंड | ९५,००० | बँकांत | ७,५०,११७ |
| इतर फंड | २९,८१५ | इनव्हेस्टमेंट | २१,६५,३१६ |
| ठेवी | ६४,१८,५३४ | कर्जे | ३६,२६,११९ |
| नफा | ६०,६९१ | इमारत | २०,००० |

नफ्यापैकीं १२,५०० रु. रिझर्व्ह फंडाकडे जाणार असून ७,५०० रु. इनव्हेस्टमेंट रिझर्व्हमध्यें वर्ग होतील. ३½% करमाफ डिव्हिडंडला २५,१२३ रु. लागतील.

---

### विमा कंपनींतील अफरातफर?

"ज्युपिटर जनरल इन्शुअरन्स कं. लि. चे चेअरमन लाला शंकरलाल ह्यांनीं कंपनीचे सुमारें ३० लक्ष रु. चे रोखे विकून त्याच्या पैशांतून ज्युपिटर कंपनीच्याच ६०,००० शेअर्सची रक्कम भरण्याची व्यवस्था केली, त्याला ऑडिटरांनीं आक्षेप घेतला. तेव्हां लाला शंकरलाल ह्यांनीं खुलासा केला कीं सरदार शार्दुलसिंग ह्यांना कंपनीनें २५,१०,६५० रु. चें कर्ज दिलें होतें, परंतु सरदार साहेबांनीं सांगितलें कीं मला रक्कम न देतां ती परस्पर ट्रॉपिकल इन्शुअरन्स कंपनीला द्या. ट्रॉपिकलचे मॅनेजिंग डायरेक्टर लाल शंकरलाल हेच होत. सरदार शार्दुलसिंग ह्यांना कर्ज दिलें, तें दिल्ली येथील त्यांच्या मालमत्तेच्या इक्विटेबल मार्टगेजवर दिलें असें सांगण्यांत आलें. परंतु प्रत्यक्ष कागद झालेला आढळला नाहीं, व्हॅल्युएशन रिपोर्टहि नव्हता आणि मालमत्तेचे दस्तऐवज नव्हते. सरदार साहेबांनीं ऑडिट पुरती एक प्रॉमिसरी नोट लिहून दिली." अशा तऱ्हेचा पोलिसांचा दावा आहे.

ज्युपिटर कंपनीचे दोन डायरेक्टर्स व सेक्रेटरी ह्यांना पोलिसांनीं अटक केली होती व त्यांची जामिनावर सुटका झाली आहे.

---


# NOTICE

## The Presidency Industrial Bank, Limited, Poona.

Notice is hereby given that the Fourteenth Ordinary General Meeting of the Share-holders of the Presidency Industrial Bank, Ltd., Poona, will be held on Sunday the 18th February 1951, at the "Commonwealth Building," at 4 p. m. to transact the following business :—

1. To receive and consider the Profit and Loss Account, the Balance Sheet and the Report of the Directors and Auditors for the year ending 31st December 1950.
*2. To declare a Dividend.
3. To elect three Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election-M/s. D. G. Bapat, S. M. Joshi, and W. P. Vaidya, retire and offer themselves for re-election. M/s. M. M. Gadre and L. M. Joshi, co-opted Directors, also retire.
4. To appoint Auditor or Auditors and to fix his or their remuneration.
5. To transact any other business as may be allowed by the Chairman.

Poona City, 27th January 1951.

By order,
C. T. Chitale,
Managing Director.

* The transfer Books of the Bank will be closed from 12th to 24th February 1951. The Dividend when sanctioned by the General Meeting will be payable on and after 5th March 1951. The Dividend Warrants will be posted to the Registered addresses of the Share-holders. Any change in the address should be immediately intimated.

# व्यापक व विचारशील दृष्टीची आवश्यकता

## लोकशाहीचा नवा धर्म

(श्री. शं. वा. किर्लोस्कर)

लोकशाहीमुळें आपल्या देशांतील प्रत्येकाला पूर्ण राजकीय, सामाजिक, व्यावसायिक व वैयक्तिक स्वातंत्र्य मिळालें आहे. आतां येथें कोणी उच्च-नीच राहिला नाहीं, अथवा कोणी कोणावर जबरदस्ती करूं शकणार नाहीं. आपल्यावर जें सरकार राज्य करणार, तेंहि आपण मतें देऊन प्रस्थापित केलेलेंच. २१ वर्षांवरील प्रत्येकाला मत देण्याचा अधिकार मिळाला आहे. या मताचा प्रत्येक स्त्री-पुरुषाला बरोबर उपयोग करितां आला पाहिजे.

आतां आपल्याला लोकशाहीमुळें विचारस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य मिळालें. पण त्याचा दुरुपयोग झाला, तर त्या स्वातंत्र्याचें काय चीज होणार ? स्वतःची सारासार विचारशक्ति व मत गुंडाळून ठेऊन वागलें, तर मात्र स्वातंत्र्याच्या फंदांत आपण उगीच पडलों, असें म्हणावें लागेल.

आपल्या मतस्वातंत्र्याला यापुढें प्रत्येकानें जपलें पाहिजे. याचा अर्थ लोकशाहीमुळें प्रत्येकाला स्वतःच्या मर्जीप्रमाणें वागण्याचा परवाना मिळाला आहे, असा मात्र नव्हे. पण आपण लोकशाही मिळविली असली तरी, देशांतील स्वतः केलेले कायदे वारकाईनें व समंजसपणें पाळूं, तरच ती टिकून राहील, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

तथापि, रोजच्या व्यवहारांत प्रत्येक बाबतींतलें स्वतःचें कर्तव्य काय, हें कायदा सांगूं शकणार नाहीं. जिला आपण लोकशाही म्हणतों, तिचें अस्तित्व मतदारांच्या याद्यांत अथवा पार्लमेंटनें पास केलेल्या कायद्यांत आहे, एवढेंच मानणें चुकीचें होईल: तर तुम्ही-आम्ही परस्परांशीं किती सलोख्यानें, सौजन्यानें व सहाय्य देण्याच्या बुद्धीनें वागतों, यावरच देशांत किती लोकशाही नांदते, हें सिद्ध होणार आहे. अरे-तुरे करून वागण्याची तऱ्हा यासाठीच यापुढें सोडली पाहिजे. लोकशाही हा एक नवा धर्म आहे. आपलें भारत सरकार कोणत्याहि धर्माचें अथवा पंथाचें नसलें, तरी लोकशाहीचें तत्त्वज्ञान सर्वांनीं आचरणांत आणणें हें यापुढील सर्वांचें राष्ट्रीय कर्तव्यच आहे. मग त्याला तुम्ही धर्म म्हणा, अथवा इतर कांहीं म्हणा. हें तत्त्वज्ञान अगदीं साधें आहे. हिंदुस्थानांत रहाणारे माझ्याप्रमाणें माझे आणखी ३२ कोट बांधव आहेत, आणि या सर्वांच्या वांट्याला जें सुखदुःख येणार, तेंच अंशतः माझ्याहि वांट्याला येणार. एवढ्यासाठी प्रत्येक बाबतींत केवळ स्वतःपुरतें पाहून मला चालणार नाहीं. माझ्या स्वतःच्या हिताबरोबर मला स्वतःच्या देशबांधवांचें जितकें हित साधतां येईल, तितकें साधण्याचा मी प्रयत्न चालविला पाहिजे. स्वतंत्र भारताचा मी एक अंश आहें, तेव्हां माझ्याकडून या देशाचें पाऊल पुढें पडण्यासाठी मला करितां येईल तें काम करीन, हा विचार आपल्या प्रत्येकाच्या अंतःकरणांत सदैव वास करीत राहिला पाहिजे. आपल्या वृत्तीला अशी घडण दिल्याशिवाय लोकशाहींतील नागरिकाला साजेसें वर्तन आपल्याकडून होऊं शकणार नाहीं.

समाजाचें हित तेंच स्वतःचें हित समजून आपण वागावें, हें कांहीं नवें नीतिशास्त्र नाहीं. पण लोकशाहीचा हाच मुख्य आचारधर्म असल्यानें हें तत्त्व केवळ तोंडानें उच्चारून चालणार नाहीं, तर तें वृत्तींत आणण्यासाठी सदैव झटावें लागेल. आपल्या समाजांत उच्चनीचतेच्या व आपपर भावनेच्या कल्पना इतक्या खोल रुजून बसल्या आहेत कीं, त्या दूर करण्यास महत् प्रयास करावे लागतील. लोकशाहीच्या मुळाशीं बसलेल्या या काटेरी कल्पना समूळ दूर केल्याशिवाय लोकशाहीला चांगलीं फळें कशीं येऊं शकतील ?

माझें घर, माझी जमात, माझी भाषा अथवा माझा प्रांत एवढ्याचाच विचार करून आपण जर हुज्जत घालूं लागलो, व त्यामुळें राष्ट्रावर कोणता अनवस्था प्रसंग गुदरेल इकडे लक्ष दिलें नाहीं, तर ती गोष्ट अराष्ट्रीय तर ठरेलच, पण लोकशाहीचा घात करणारी आहे, हें आपणास विसरतां कामा नये. अशा करण्यासाठीं आपण हातघाईला येऊं लागलों व कलहाचीं बीजें पेरीत असलों तर, बळी तो कान पिळी हाच न्याय सगळीकडे सुरू होईल. देशांतील लोकशाहीचा निकाल लागायला मग वेळ नको.

लोकशाहीचें स्वागत करितांना जुन्या आकुंचित दृष्टीचा त्याग करून नव्या व्यापक व जास्त विचारशील दृष्टीचा आपल्यास स्वीकार केला पाहिजे. अशा विचाराचे स्त्री-पुरुष देशांत जितके जास्त होतील, तितकी आपल्याला प्राप्त झालेली लोकशाही अधिक मजबूत व प्रभावी होईल. आपल्यापेक्षां पुढें गेलेल्या जगांतील इतर राष्ट्रांत लोकशाहीचा डंका जोरानें वाजत आहे, व या लोकशाहीचीं मधुर फळें प्रत्येकाला चाखायला मिळत आहेत. याचें कारण, त्या देशांतील प्रत्येक माणूस तेथील लोकशाहीला साजेल अशा प्रकारेंच वागत असतो. एवढेंच नव्हे, तर या लोकशाहीवर संकट येण्याचें चिन्ह दिसतांच हजारों तरुण तळहातावर शीर घेऊन तिचें रक्षण करण्यास पुढें येतात. देशाच्या स्वातंत्र्याला ते प्राणापलीकडे जपतात, आणि आमच्याकडे टेरिटोरिअल आर्मीसाठी ५०० माणसें हवीं असलीं, तर तेवढीं मिळायला देखील किती मारामार पडते, हें आपण पहातो. असें झालें तर देशाची गत काय होणार ?

आजच आपल्या देशाची स्थिति किती चिंताजनक झाली आहे, याचें चित्र आपल्यापुढें उभें आहे. अन्नाची दुर्भिक्षता, व तीमुळें अक्राळ विक्राळ रूप धारण करणारी महागाई, यांनीं सगळीकडे जनता हैराण झाली आहे. घरांत ही दुश्चित्त करणारी स्थिति. जरा पलीकडे पहावें तों काश्मीर प्रकरण चिघळत चाललेलें, आणि या सर्वांना मागें टाकणारें कोरियांतील महत्संकट साऱ्या जगाला गर्भगळित करून सोडीत आहे. कोरियांतील युद्ध शांत होण्याचें अद्याप तरी चिन्ह नसून, त्याचा डोंब सगळीकडे केव्हां पसरेल याचा नेम राहिला नाहीं. आजच्या क्षणाला सारी मानवजात या भावी प्रलयाच्या विवंचनेंत जशी मग्न झाली आहे, तशी जगाच्या इतिहासांत केव्हांहि झाली नसावी.

या अभूतपूर्व संकटाला तोंड देण्यास आपलें सारें धैर्य व सारी कर्तृत्वशक्ति एकवटावी लागणार आहे. या देशांत आपण जन्माला आलों, त्यांत एकाद्या किडामुंगीसारखें आपल्याला जगावयाचें नाहीं. या राष्ट्राला नव्या नवसानें लाभलेल्या लोकशाहीचें रक्षण व तिचें पालनपोषण करणारे पराक्रमी भारतवासी आहोत, हें लक्षांत ठेऊं, तर आपल्याला कोणत्याहि परिस्थितीपुढें डगमगण्याचें कारण रहाणार नाहीं.

एवढ्यासाठी आपण लहान थोर सर्वजण अशी प्रतिज्ञा करूं या कीं, भारताच्या लोकशाहीचें जतन करण्यासाठीं माझ्यावरील जबाबदारींचा मी केव्हांहि स्वतःला विसर पडूं देणार नाहीं. ही जबाबदारी पार पाडण्यासाठीं जें कर्तव्य मला करावें लागेल, तें मी अत्यंत मनोभावें आणि उत्साहानें करीत राहीन.

(प्रजासत्ताक दिनाचे वेळीं केलेलें अध्यक्षीय भाषण, किर्लोस्करवाडी, २६-१-५१).

**पाटबंधाऱ्यांमुळें भिजणारी जमीन**—हिंदी संघराज्यांतील पाटबंधाऱ्यांच्या पाण्यानें भिजणाऱ्या जमिनीचें क्षेत्रफळ इतर कोणत्याहि देशांचे पेक्षां अधिक आहे; परंतु देशांत लागवडीखालीं असलेल्या जमिनीशीं हें प्रमाण अवघें २० टक्केच पडतें. ही माहिती मध्यवर्ती सरकारच्या वॉटर पॉवर, इरिगेशन अँड नॅव्हिगेशन कमिशनच्या पुंचवार्षिक अहवालांत नमूद करण्यांत आली आहे.

**पाकिस्तानांत काड्याच्या पेट्यांचा कारखाना**—प. पाकिस्तानांतील खैरपूर येथें आगपेट्यांचा एक खूप मोठा कारखाना उभारण्यांत य्येत आहे. हा एकटा कारखाना प. पाकिस्तानची आगपेट्यांची अर्धी गरज भागवूं शकेल. 'बोहन' जातीच्या वृक्षाचें लाकूड पेट्या आणि काड्या करण्यास उपयुक्त आहे असें सिद्ध झाल्यावरच कारखाना बांधण्याचा निर्णय घेण्यांत आला. कारखान्यांतून दोन महिन्यांत काड्याच्या पेट्या बाहेर पडूं लागतील. धंद्याला लागणारीं रसायनें मात्र परदेशांतून आयात करावीं लागतील.

**भारतांतील कागदाचें उत्पादन**—१९५० सालीं भारतांतील कागदाच्या गिरण्यांनीं १,१०,४०० टन कागद निर्माण केला. ह्या सालांत १,१०,००० टन कागद निर्माण करण्याचें ठरलेलें होतें. इंडिअन पेपर मिल्स असोसिएशनच्या वार्षिक सभेंत भाषण करतांना संस्थेचे अध्यक्ष श्री. बाजोरिआ ह्यांनीं वरील माहिती सांगितली. कागद तयार करण्यास लागणाऱ्या कच्च्या मालाची निर्यात थांबविण्यांत यावी अशी मागणीहि त्यांनीं केली.


**गप्प बसा आणि खर्च वाचवा**—भारतीय पार्लमेंटचे एक सभासद पं. इंद्र वाचस्पति ह्यांनीं आपलें पहिलें भाषण नुकतेंच केलें. पार्लमेंटचे सभासद ते पहिल्यापासून आहेत. विधिमंडळाच्या कामकाजाच्या प्रत्येक मिनिटाला ६० रुपये खर्च येत असल्यानें आपण इतक्या दिवस तोंड उघडलें नव्हतें, असा खुलासा त्यांनीं केला.

**भारतांतील बेकारी वाढली**—१९५० सालांतील अखेरच्या काळांत भारतांतील व आणखी चार देशांतील बेकारांची संख्या १९४९ सालांतील ह्याच काळाच्या मानानें वाढली असल्याचें इंटरनॅशनल लेबर ऑफिसतर्फे जाहीर झालें आहे. १९४९ सालीं भारतांत २,९१,५८४ गरजू लोकांनीं नोकरीसाठीं नांवें नोंदलीं होतीं. १९५० सालच्या नोव्हेंबर महिन्यांत ३,३३,६२२ लोकांनीं आपलीं नांवें नोंदाविल्याचें दिसतें. भारताप्रमाणेंच ऑस्ट्रिआ, डेन्मार्क, फ्रान्स व प. जर्मनी ह्याहि देशांत बेकारांची संख्या वाढली आहे.

**सुरतेमधील यांत्रिक मागांचा धंदा**—गेल्या दहा वर्षांत सुरतेंतील यांत्रिक मागाच्या धंद्याची खूप प्रगति झाल्याचें सुरत चेंबर ऑफ कॉमर्सच्या १९४९-५० सालच्या अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. सुरत शहरांत सध्या ८,००० यांत्रिक माग आणि ३,००० हातमाग आहेत. ह्या मागांवर दरवर्षी सरासरी ४ कोटी रुपये किंमतीचें जरीचें कापड निघतें. सुरतेंतील १,३०० लहानमोठ्या कारखान्यांत मिळून ३०,००० कामगार गुंतलेले आहेत.

**सरकारी मालकीचा हत्यारांचा कारखाना**—भारत सरकारनें काढूं घातलेल्या यांत्रिक हत्यारांच्या कारखान्याच्या कामाला चालू वर्षाच्या मध्याला सुरवात होईल असें समजतें. कारखान्याचा नकाशा काढण्याचें कामही त्याच सुमाराला पूर्ण होऊन इमारतीचें बांधकाम मार्गी लागेल. कारखान्याची यंत्रसामुग्री पूर्वीच आलेली आहे.


रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ताः—PEDNECO, Bombay. फोन नं. २९७३८

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

## तलाव बांधण्यापूर्वी नीट चौकशी करा

### से. निवृत्त सुपरिंटेंडिंग इंजिनिअर, रा. ब. जोशी ह्यांचा बोधप्रद इषारा

रा. रा. संपादक अर्थ यांस न. वि. वि.

"केसरीच्या" दि. १२ डिसेंबरच्या अंकांत "गुनवडी" (अहमदनगर जिल्हा) येथें एक जलाशय बांधावा अशी सूचना केली होती.

त्याबद्दल खालील माहिती उपलब्ध झाली आहे.

निश्वार-क्षेत्र:—(Catchment Area):—२७ चौरस मैल.
जलाशयांतील नियोजित (Designed) साठा (Storage Capacity):—२४३ प्रघट (Million Cubic feet)
अंदाजी किंमत:— १२.८७ लक्ष रुपये.

अशा या जलाशयांत दरवर्षी पाणी किती येईल व त्यावर क्षेत्र किती भिजेल याचा अंदाज इतर रीतीनीं करण्याऐवजीं तशाच प्रकारच्या व जवळ जवळ तेवढ्याच आकाराच्या पण अस्तित्वांत असलेल्या एकाद्या आकल्पाचे आकडे घेतले म्हणजे अंदाज चुकण्याचा संभव रहाणार नाहीं. म्हणून तसल्याच प्रकारच्या इतर दोन-तीन जलाशयांचे आंकडे खालील कोष्टकांत देत आहे.

| | अस्तित्वांत असलेले जलाशय | | | प्रकल्पित जलाशय | |
|---|---|---|---|---|---|
| | शिरसुफळ | भादलवाडी | मातोडी | गुनवडी | |
| जिल्हा | पुणें | पुणें | नगर | नगर | |
| निश्वार-क्षेत्र (Catchment Area) | २३.५ | २३ | ४० | २७ | चौरसमैल |
| बांधल्याचें साल | १८८० | १८८२ | १८७२ | | इ. स. |
| खर्च | २.२५ | २.२७ | ३.८ | १२.८७ | लक्ष रुपये |
| जलाशयातील सांठा | ४५१ | १६१ | ५९ | २४३ | प्रघट (Millon cubic feet) |
| सरासरी दरसाल भिजलेलें क्षेत्र | ९९७ | १११८ | ६७६ | ? | एकर |

उपरिनिर्दिष्ट सर्व जलाशयांच्या निश्वार क्षेत्रांत पाऊस जवळ जवळ सारखाच पडतो; त्यामुळें प्रकल्पित गुनवडी जलाशयांत पाणी किती येईल व किती क्षेत्र भिजेल याचा अंदाज स्थापत्य विषयाचें ज्ञान नसणाऱ्या इसमासही वरील ३ जलाशयांच्या आकड्यांवरून सहज करतां येईल. आकड्यांवरून बघतां, गुनवडी जलाशयाखालीं दरसाल सरासरीनें ५०० ते १२०० एकर क्षेत्र भिजेल. लोकांनीं अपेक्षिलेला आंकडा ५ ते ६ हजार हा अशक्य आहे, हें समजण्यास वरील आंकडे पुरेसे आहेत.

शिरसुफळ, भादलवाडी, व मातोडी हीं धरणें बांधलीं त्यावेळीं स्वस्ताई असल्यामुळें किंमत २½ ते ३½ लाख रु. पडली. गुनवडी तलावास आजच्या मानानें किंमत १३ लाख रु. पडणार. खर्चातें च वजा जातां पण व्याज न धरतां वरील तीन प्रकल्पांस मूळ खर्चावर अनुक्रमें शेकडा १.१२, ०.८२, व १.०५ इतकी शिल्लक राहिली असा इरिगेशन इन्कायरी कमिटी १९३८ च्या अहवालांत अधिकृत आंकडा दिला आहे. अर्थात, शेकडा ४ टक्क्यांनीं व्याज आकारल्यास दरसाल सुमारें ३ टक्के तोटा येतो.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.**



(स्थापना १९१८)
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.
शाखा : दादर, माहीम, बेळगांव


गुनवडी तलावाची किंमत १३ लाख रुपये लक्षांत घेतां किती तोटा दरवर्षी येईल याचा अंदाज वरील आंकड्यांवरून कोणीही सहज करूं शकेल.

वरील ३ जलाशयांपैकीं शिरसुफळ तलाव २० वर्षांत एखादे वेळींच पूर्ण भरतो व भादलवाडी ५ वर्षे भरतो. २० वर्षांमध्यें शिरसुफळ तलाव १२ वर्षे व भादलवाडीही ५ वर्षे जवळ जवळ कोरडा असतो. त्यावरून गुनवडी जलाशय बांधल्यास त्याची काय अवस्था होईल याची कल्पना येईल.

तलाव बांधण्यावर खर्च करण्यापूर्वी संबंधित लोकांना परिस्थितीची जाणीव असावी या उद्देशानें वरील माहिती दिली आहे. त्यावरून योग्य तो बोध घेतला जावो अशी आशा करणें वावगें ठरणार नाहीं.

कळावे हे विनंती

आपला
नरहर सदाशिव जोशी

### जमिनीखालीं मोटार पार्किंगची सोय

मर्कंटाइल नॅशनल बँक ऑफ डलास ह्या अमेरिकन बँकेनें आपल्या खातेदारांसाठीं ३ एकर जागेचें भुयार मोटार गाड्या ठेवण्याकरितां तयार केलें आहे. त्यांत दररोज १५०० मोटारींची ये-जा होऊं शकेल. बँकेच्या ठेवीदारांना पास दिले जातील, ते दाखविले तर ठेवीदारांच्या मोटारींस तळघरांत प्रवेश मिळेल व एक तास तेथें मोटार ठेवतां येईल. त्यानंतरच्या वेळेस दर तासीं १० सेंट आकार पडेल. बँकेची इमारत मध्यवर्ती ठिकाणीं असल्यानें खातेदारांची मोठीच सोय होणार आहे. विश्रांतीसाठीहि तळघरांत आरामशीर व्यवस्था करण्यांत आली आहे.

### साखरेचें उत्पादन

महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांचें साखरेचें चालू मोसमांतील उत्पादन गेल्या वर्षापेक्षां अधिक तर नाहींच, परंतु कदाचित कमीच होण्याचा संभव आहे, असें उत्पादनाचा प्राथमिक अंदाज दर्शवितो. गेल्या दोन वर्षांतील एका वर्षापेक्षां १०७% पेक्षां जें उत्पादन अधिक होईल तें खुल्या बाजारांत विकण्याची सर्व कारखान्यांना सवलत देण्यांत आली आहे.

### क्लिव्हलँड बँकेची फिल्म

फेडरल रिझर्व्ह बँक ऑफ क्लिव्हलंड ह्या अमेरिकन बँकेनें बँकेचा व्यवहार कसा चालतो हें दाखविणारी १६ मिमि. ची २२ मिनिटें चालणारी फिल्म तयार केली आहे. फिल्ममध्यें दिसणारे सर्व लोक बँकेचे अधिकारी व नोकर हेच आहेत. बँकर्स, व्यापारी, स्त्रियांच्या संस्था, इतर क्लब व असोसिएशन्स शाळा, इत्यादींनीं केवळ टेलिफोन केल्यास ही फिल्म दाखविण्याची व्यवस्था बँक तत्परतेनें करते.

## रेल्वे बोर्डाचें १९४९–५०चें प्रतिवृत्त

प्रतिवृत्ताच्या वर्षी रेल्वे वहातुकीचें एकूण उत्पन्न २३६·३५ कोटी रु. म्हणजे १९४८–४९ च्या उत्पन्नाहून २३·२५ कोटी रु. अधिक झालें. उतारू वहातुकीचें ८६·३५ कोटी व माल वहातुकीचें १३०·३७ कोटी रु. उत्पन्न झालें. बाकीचें १९·६३ कोटी. रु. इतर किरकोळ उत्पन्नाच्या बाबींपासून झालें. एकंदर कामाचा खर्च १८१·५३ कोटी व घसारा निधीसाठीं ११·५८ कोटी रु. खर्ची टाकण्यांत आले. इतर विविध व्यवहार जमेस धरता निव्वळ उत्पन्न ३७·७७ कोटी रुपये झालें. १९४८–४९ मध्यें तें ४२·३४ कोटी म्हणजे ४·५७ कोटी रु. अधिक होतें. गतवर्षी २२·३६ कोटी रु. व्याजापोटी द्यावे लागले होते, तर यंदा २३·१८ कोटी रु. द्यावे लागले. गतवर्षी १९·९८ कोटी रु. शिल्लक राहिली होती तर या वर्षी ५·३९ कोटी रु. कमी म्हणजे १४·५९ कोटी रु. राहिली.

भारत सरकारचें आर्थिक संबंध नसलेल्या रेल्वेसुद्धां सर्व रेल्वेचें एकूण उत्पन्न २५८.३१ कोटी रु. झालें. त्यांत १३५·७० कोटी रु. माल वहातुकीचें, ९५·२३ कोटी उतारू वहातुकीचें आणि इतर सामान व किरकोळ बाबींचें २७·३८ कोटी रु. होते.

### भांडवली खर्च

तयार होत असलेल्या मार्गांसुद्धां सर्व रेल्वेचें चालू भांडवल १९४९-५० चे अखेरीस ८१२·९९ कोटी रु. होतें. यापैकीं ७३६·१४ कोटी भारतीय सरकारी आणि ७६·८५ कोटी रु. भारतीय संस्थानें, कंपन्या, जिल्हा बोर्डे वगैरेंचे होते. सर्व रेल्वेवर मिळून ३७·३९ कोटी रु. भांडवली खर्च झाला. त्यांपैकीं भारत सरकारच्या रेल्वेवरच ३४·२५ कोटी रु. खर्च झाले.

### नवीन रेल्वेमार्ग व कारखाने

प्रतिवृत्ताच्या वर्षी २३३·१४ मैलांचे नवे मार्ग वहातुकीसाठी सुरू करण्यांत आले, ३१० मैलांच्या मार्गांची पहाणी मंजूर करण्यांत आली, १४ कोटी रु. खर्चून तयार केलेल्या आसाम रेल्वे मार्गाची सुरवात झाली, या गोष्टी उल्लेखनीय आहेत. २६ जानेवारी, १९५० रोजीं चित्तरंजन कारखान्याचें औपचारिक रीत्या उद्घाटन श्रीमती वासंतीदेवींच्या हस्तें करण्यांत आलें.

### रेल्वेसाठी सामान-खरेदी

भारत सरकारच्या रेल्वेसाठीं प्रतिवृत्ताच्या वर्षी ८६ कोटी रु. चें सामानसुमान खरेदी करण्यांत आलें. गतवर्षीची खरेदी १००·१४ कोटी रु. ची होती. यापैकीं ६६·५८ कोटी रु. चा देशांत तयार झालेला माल असून उरल्यापैकीं ११·०६ कोटी रुपयांचा माल परदेशांहून थेट आयात करण्यांत आला. भारतांतील व्यापाऱ्यांमार्फत विकत घेतलेल्या आयात मालाची किंमत ८·३६ कोटी रु. झाली.

### नोकरवर्ग-

रेल्वे बोर्ड आणि इतर कचेऱ्यांतील अधिकाऱ्यांसुद्धां सर्व भारतीय रेल्वेच्या हंगामी व कायम नोकरांची संख्या मागील वर्षअखेरीस ९,२७,८८१ होती, ती कमी होऊन अहवालाच्या वर्षअखेरीस ८,९९,२४८ वर आली. पहिल्या दर्जाच्या रेल्वेच्या नोकरवर्गांचा पगार, भत्ते, प्रॉव्हिडंड फंड व बक्षिसी, इत्यादींसाठी १०४·६ कोटी रु. खर्च झाले. मागील वर्षी यासाठीं १०५ कोटी रु. लागले होते.

रेल्वे धान्य-दुकान चौकशी समितीच्या शिफारशीनंतर रेल्वे नोकरांना धान्य व इतर माल विकणाऱ्या दुकानांची संख्या ५८९ वरून ३८८ पर्यंत खालीं आली. त्यामध्यें खरेदी करणाऱ्या नोकरवर्गाची संख्याहि ६,१३,००० वरून ५,३१,००० पर्यंत आली. यांपैकीं २,७३,००० सवलतीच्या दरानें खरेदी करणारे व २,५८,००० नियंत्रित दरानें खरेदी करणारे होते.

## तयार मालाची विक्रीपूर्वी कसून तपासणी

आपल्या गिऱ्हाइकांना हलक्या प्रतीचा माल मिळूं नये म्हणून बरेच अमेरिकन कारखानदार आपल्या कारखान्यांत तयार झालेल्या मालाची प्रयोगशाळेंत कसून तपासणी करवून घेतात. उदाहरणार्थ, न्यूजर्सी राज्यामधील हॉबोकेन येथील एका प्रयोगशाळेंत दरवर्षी ३०,००० वस्तूंची तपासणी होते. या वस्तूंत स्त्रियांच्या वस्त्रप्रावरणापासून ते सिमेंटच्या दगडापर्यंतच्या वस्तू समाविष्ट आहेत. संसर्गजन्य रोग, जीवनसत्त्वाचें प्रमाण, रुचि, उष्णता, टिकाऊपणा, कठीणपणा, मऊपणा, रोगप्रतिकारकशक्ति, इ. अनेक कारणासाठीं उत्पादित वस्तूंची परीक्षा करण्यांत येते.

ही परीक्षा यंत्राच्या साहाय्यानें चालते. एकाद्या वस्तूची परीक्षा करण्यास प्रयोगशाळेजवळ योग्य प्रकारचें यंत्र नसेल, तर तशा यंत्राचा शोध लावण्यांत येतो. कांहीं वेळां उत्तम दिसणारी वस्तु यंत्रानें फोडून कारखानदाराच्या इच्छेप्रमाणें ती वस्तु विशिष्ट दर्जाची झाली आहे कीं नाहीं हेंहि पहाण्यांत येतें. एकाद्या गलेलठ्ठ माणसानें आपल्या कारखान्यांतील गादी तुडविली तरी ती किती वर्षें टिकूं शकेल, हें एका गादीच्या कारखानदाराला अजमावयाचें होतें. त्यासाठीं एक यंत्र बनविण्यांत आलें. त्या यंत्रानें गादीवर २७० पौंडांचा रूळ फिरून दर मिनिटाला ३० वेळां गादीचा चुरगळा होत असे. त्या यंत्रानें परीक्षा करण्यांत आली.

घड्याळाच्या टिकाऊपणा पारखून पहाण्यासाठीं ४ फूट उंचीवरून घड्याळ लांकडाच्या जमिनीवर फेंकणारें व नंतर तें पांच मिनिटें पाण्यांत बुडवून ठेवणारें यंत्र तयार करण्यांत आलें. पायमोजे तुटेपर्यंत ताणावयाचे आणि नंतर सुताची प्रतिकारक्षमता पाहाण्यासाठीं लोखंडाचा खिळा घालून पाहावयाचा, असेंहि एक यंत्र आहे. वस्तूंची अशा प्रकारची तपासणी करण्यासाठी स्त्री-पुरुषांचाच काय, पण अनेक प्रकारचे जंतु आणि जनावरें यांचाहि उपयोग करून घेतला जातो. ऊन, घाम, धुणें व वापरणें यांचा कपड्यावर काय परिणाम होतो याचीही परीक्षा केली जाते.

## मनिलेंडर्स रूल्समध्यें दुरुस्ती

१९४७ च्या बॉंबे मनिलेंडर्स रूल्समध्यें दुरुस्ती करण्याबाबतचें नोटिफिकेशन मुंबई सरकारच्या ता. २५ जानेवारीच्या गॅझेटच्या भाग ४ ब मध्यें प्रसिद्ध झालें आहे. कागदपत्रांच्या नकला, तसेंच बॉंबे मनिलेंडर्स ॲक्टाच्या ७ व्या कलमाखालीं कोणत्याहि प्रकारची चौकशी करण्यासाठीं १३ व्या कलमानुसार कोणत्याहि इसमावर त्यानें हजर रहावें म्हणून जें समन्स काढावयाचें असतें त्याचे फॉर्म मिळविण्याची कार्यपद्धति या दुरुस्तीनुसार ठरवून देण्यांत आली आहे.

## कोऑपरेटिव्ह हौसिंग फिनॅन्स कॉर्पोरेशन

वरील कॉर्पोरेशनच्या स्थापनेबाबत तपशील ठरविण्यासाठी मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली आहे. मुंबई राज्यांतील हौसिंग सोसायट्यांना लागणाऱ्या कर्जाचा विचार करतां आणि हें कर्ज मिळवून देण्याची शक्यता लक्षांत घेतां अशा कॉर्पोरेशनची गरज आहे असें मुंबई येथील एका परिषदेंत मत व्यक्त करण्यांत आलें. कमिटीचे सेक्रेटरी रजिस्ट्रार श्री. चिन्मुळगुंद हे आहेत.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.